**निशाणी क्रं. सी–५ वर आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी/आरोपी क्रं. २ ह्यांनी दाखल केला असून असे नमुद केले आहे की, या प्रकरणात मदनसिंग तुराबसिंग राजपुत, गटविकास अधिकारी, खामगाव असे लिहीलेले आहे. परंतु, सदर नावाची व्यक्ति गटविकास अधिकारी, खामगाव म्हणून अस्तित्वात नाही. म्हणून प्रस्तुतचे प्रकरण प्रतिवादी/आरोपी विरूध्द खारीज करण्यात यावे.

२) तक्रारदारांनी प्रस्तुतच्या अर्जावर जोरदार हरकत नोंदवून असे प्रतिपादन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज फेटाळून लावण्यात यावा तसेच, प्रतिवादी ह्यांच्या नावात झालेली चुक ही पुर्वीचे प्रतिनिधी ह्यांच्याकडून झालेली आहे व ती दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने दुरूस्तीसाठी वेळ मिळावा आणि अर्ज फेटाळून लावण्यात यावा.

३) प्रतिवादी/आरोपी क्रं. २ ह्यांचे कथन आणि युक्तिवाद आणि तक्रारदारांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर हे स्पष्ट होते की, प्रस्तुतच्या प्रकरणात तक्रारदारांनी प्रतिवादी क्रं. २ म्हणून मदनसिंग तुराबसिंग राजपुत, गटविकास अधिकारी, खामगाव असे नमुद केले आहे आणि आजरोजी या न्यायालयात न्यायालयाची नोटीस मिळाल्यानंतर हजर झाले आहेत ते चंदनसिंह राजपुत. ज्यांचा आणि प्रतिवादी/आरोपी ह्यांचे नांव वेगवेगळे आहे. त्याचप्रमाणे,

तक्रारदारांनी असे कथन केले आहे की, या नावात दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी परंतु, मुळातच प्रस्तुतचे प्रकरण हे दि. २८/०५/२०२४ रोजी दाखल करण्यात आले आणि तक्रारदार हे आज म्हणजे दि. ११/०३/२०२५ रोजी दुरूस्तीची परवानगी मागत आहेत, जी या स्थितीला पुर्णपणे चुकीची ठरते. त्यामुळे या प्रकरणातून चंदनसिंह राजपुत ह्यांचे नांव वगळण्यात येत आहे. त्याचबरोबर, प्रतिवादी/आरोपी ह्यांनी नि. सी-६ खाली दि. ०७/०३/२०२५ चे शिक्षक संचालक यांना निर्गमित केलेल्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे आणि तक्रारदारांची मागणी लवकरात लवकर पुर्ण करण्यासंदर्भात निर्देशीत करण्यात आले आहे, त्यामुळे प्रतिवादी/आरोपी ह्यांना असे निर्देशीत करण्यात येत आहे की, त्यांनी मा. औद्योगिक न्यायालय, अकोला ह्यांनी पारित केलेल्या आदेशाची लवकरात लवकर पुर्तता करावी, या आदेशान्वये प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**स्वा/-**

**दिनांक :- ११/०३/२०२५**

**(शार्दुल श. जहागिरदार)**
**न्यायाधीश,**
**कामगार न्यायालय, बुलढाणा.**

**ठिकाण :- बुलढाणा.**